# प्रेस नोट दिनांक २१/०८/२०१९
# चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## सुरक्षारक्षक एजन्सी चालक यांची सुरक्षिततेच्या दृष्टीने मिटींग घेतलेबाबत

दि.२१/०८/२०१९ रोजी १४.३० ते १६/०० वा. दरम्यान चंदननगर पोलीस स्टेशन हद्दीतील प्रभुश्री मंगल कार्यालय, चंदननगर, पुणे या ठिकाणी मा.सहा. पोलीस आयुक्त सो, येरवडा विभाग, पुणे शहर यांनी येरवडा विभागातील येरवडा पोलीस स्टेशन, विमानतळ पोलीस स्टेशन व चंदननगर पोलीस स्टेशन हद्दीतील खाजगी सुरक्षा एजन्सी चालक यांची मिटींग आयोजित केली होती. सदर मिटींग मध्ये मा. श्री देसाई सो, सहा. पोलीस आयुक्त, येरवडा विभाग, पुणे शहर यांनी मा.पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांचेकडुन प्राप्त सुचनांची माहीती खाजगी सुरक्षा चालक यांना देण्यात आलेल्या असुन सदर सुरक्षा रक्षक हे साध्या वेशातील पोलीस ही संकल्पना समजावुन सांगण्यात आली. मा. पोलीस आयुक्तालयाकडून राबविण्यात येत असलेली पुणे पोलीस व सुरक्षा रक्षक संस्था यांचे समन्वयातुन पोलीस प्रायव्हेट सिक्युरिटी पार्टनरशिप प्रोग्राम (पी ४) ची माहिती देवून सुरक्षा रक्षकांकडून गोपनिय माहिती संकलन करण्याचे मार्गदर्शन केले. सदर मिटींग मध्ये श्री शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांनी पोलीसांना सुरक्षितेकरीता पी ४ माध्यमातुन माहिती देवून कायदा व सुव्यवस्था राखण्यामध्ये सुरक्षा रक्षक हे प्रभावी माध्यम ठरु शकते याबाबत माहिती व सुचना दिल्या. आगामी सार्वजनिक उत्सवामध्ये पोलीसांसह सुरक्षा रक्षक यांनीही कर्तव्यामध्ये सहभागी करण्याबाबत अवाहन केले. सायबर क्राईम, चोरी, घरफोडी, वाहन चोरी, अपघात याची माहिती देवून त्याकरीता आवश्यक प्रतिबंधात्मक उपययोजनाची माहिती दिली. सदर मिटींगकरीता सपोनि खोकले, विमानतळ पो.स्टे हे हजर होते. येरवडा विभागातुन चंदननगर पो.स्टे., येरवडा पो.स्टे. व विमानतळ पो.स्टे हद्दीतील एकुण ५२ सुरक्षा एजन्सीचे चालक व मालक हजर होते. सर्व सुरक्षा एजन्सी चालकांकडून पोलीसांकडून राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाचे कौतुक करुन सहकार्य करण्याचे अश्वासन दिले. तसेच त्यांना सुरक्षेसंबधाने योग्य त्या खबरदारी घेण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सिक्युरिटी गार्ड यांना सदर परिसरामध्ये कोणतीही अनुचित घटना संशयीत इसम, वाहने, वस्तु यांची माहिती मिळालेस अथवा लक्ष्यात येताच सदर घटनेची माहीती सिक्यरिटीच्या मेन इंचार्ज यांना कळवुन त्यांची शहानिशा केल्यानंतर पोलीस स्टेशन कडील व्हास्ॲप ग्रुपवर तसेच संबंधित पोलीस स्टेशन फोन नंबर व पोलीस नियत्रंण कक्ष १०० वर कळविणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. सिक्युरीटी गार्ड यांनी रात्रपाळीचे वेळी सतर्कपणे डयुटी करावी. सोसायटी, कंपनी यामध्ये येणा-या सर्व गाडयाची मिरर तपासणी करुन आत सोडाव्यात व प्रत्येक गाडीची डीकी चेक करावी, प्रत्येक नोकरदाराचे आयडी कार्ड चेक करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर मिटींगमध्ये सुरक्षा एजन्सीचे चालक व मालक यांचेसह सुरक्षा रक्षक असे एकुण १०० ते १२५ जनसमुदाय हजर होता.

सदरची चांगली कामगीरी मा. सहायक पोलीस आयुक्त सो, श्री, रामचंद्र देसाई, मा.श्री शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. व सपोनि खोकले, विमानतळ पो.स्टे असे व पोस्टे कडील कर्मचारी पोहवा हरी कदम, पोना अनिरुध्द जायभाय, पोशि पांडुरंग नाणेकर यांनी केलेली आहे. सदर मिटींगचे घेण्यात आलेले फोटो खालीलप्रमाणे:-




पुणे पोलीस व सुरक्षा रक्षक संस्था
पोलीस प्रायव्हेट
पार्टनरशिप प्रोग
(पी-४)